नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ९१ Issue - 91 | वार सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५ Blow- Monday Date 18 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भाजपचं धक्कातंत्र; महाराष्ट्राचे राज्यपाल होणार देशाचे उपराष्ट्रपती?

## भाजपकडून अधिकृत उमेदवाराची घोषणा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीबाबत मोठी बातमी समोर येत आहे. उपराष्ट्रपतीच्या पदाच्या निवडणुकीसाठी एनडीएचा उमेदवार निश्चित झाल्याची माहिती समोर येत आहे. महाराष्ट्राचे सध्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची निवड उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी करण्यात आली आहे. भाजपचे सध्याच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत मोठी घोषणा केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून एनडीएकडून उपराष्ट्रपतीच्या पदाच्या निवडणुकीसाठी कुणाला उमेदवारी दिली जाईल? याबाबत सस्पेन्स होता. अखेर या सस्पेन्सवर पडदा पडला आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून उपराष्ट्रपती पदाचा उमेदवार कोण असेल? याबाबत सस्पेन्स होता. उपराष्ट्रपती पदाचा उमेदवार ठरवण्यासाठी भाजपकडून जे. पी. नड्डा यांना महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली होती. उपराष्ट्रपतीपदासाठी अनेक नावांची चर्चा होती. पण जे नाव चर्चेतही नव्हतं असं नाव अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर करण्यात आलं आहे. यातून भाजपने पुन्हा एकदा धक्कातंत्रचा अवलंब केल्याचं उघड झालं आहे.

उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी उमेदवार ठरवण्याबाबत एनडीची बैठक झाली. अनेकांच्या सूचना मागवण्यात आल्या. यानंतर महाराष्ट्राचे आमचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपती पदासाठी उमेदवार ठरवण्याचं आमचं निश्चित झालं, अशी माहिती जे. पी. नड्डा यांनी दिली.

भाजप, मित्रपक्ष आणि एकंदरीत एनडीएकडून सर्व राजकीय पक्ष, विरोधी पक्ष, विरोधी पक्ष-नेते यांच्यासोबत आमच्या वरिष्ठ नेत्यांनी संपर्क साधला आहे. उपराष्ट्रपती पदासाठीची निवडणूक बिनविरोध व्हावी, सर्वांच्या सहमतीने निवडणूक व्हावी आणि भाजपचा उमेदवार असावा याबाबत आम्ही त्यांच्यासमोर मुद्दा मांडला आहे. विरोधी पक्षांनी उमेदवार कोण असेल ते पाहून आम्ही भाजपच्या उमेदवाराला पाठिंबा द्यायचा की नाही ते ठरवू असं सांगितलं आहे. आमच्या एनडीएच्या सहकाऱ्यांसोबतही सविस्तर चर्चा झाली आणि त्यांनतर आम्ही ही खुशखबरी देत आहोत. संसदीय बोर्डाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली, अशी माहिती जे पी नड्डा यांनी दिली.

# मतचोरी सारख्या शब्दांचा चुकीच्या शब्दांचा वापर करुन भ्रम निर्माण करणे हा संविधानाचा अपमान




केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्तांनी फटकारले

नवी दिल्ली : देशाच्या राजकारणात सध्या मोठ्या घडामोडी सुरु आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याकडून केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यप्रणालीवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. बिहार डखठ च्या मुद्द्यावरुन राहुल गांधी यांच्याकडून निवडणूक आयोगावर अतिशय गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवेळी मतचोरी झाल्याचा गंभीर आरोप राहुल गांधींनी केला आहे. केवळ महाराष्ट्रच नाही तर कर्नाटकाच्या निवडणुकीतही मतचोरी झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. या दरम्यान बिहार डखठ प्रकरणी सुप्रीम कोर्टात नुकत्याच पार पडलेल्या सुनावणीत कोर्टाने सर्व मतदारांची यादी जाहीर करण्याची सूचना निवडणूक आयोगाला दिली होती. दुसरीकडे निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना प्रतिज्ञापत्राद्वारे आपल्या आरोपांबाबतची माहिती अधिकृतपणे निवडणूक आयोगाकडे सादर करण्याचं आवाहन केलं होतं. तसेच पुराव्यांची देखील मागणी केली होती. या सगळ्या आरोप-प्रत्यारोपांच्या गदारोळानंतर आज निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेतली. केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी यावेळी भूमिका मांडली.

प्रत्येक राजकीय पक्षाची नोंद ही केंद्रीय निवडणूक आयोगात होत असते. त्यामुळे निवडणूक आयोगासाठी प्रत्येक पक्ष सारखे आहेत. निवडणूक आयोग याबाबत कोणताही भेदभाव करत नाही.

गेल्या दोन दशकांपासून विविध राजकीय पक्षांकडून मतदार सूचींमध्ये काही त्रुटी असल्याची तक्रार करण्यात येत होती. त्या त्रुटींमध्ये सुधारणा करण्यासाठी बिहारपासून सुरुवात करण्यात आली आहे. बिहारमध्ये स्पेशल इन्टेन्सिव रिव्हिजन म्हणजे डखठ ची सुरवात झाली आबे. बिहारमध्ये या प्रक्रियेनंतर मतदार सूची तयार करण्यात आली. त्याची कॉपी सर्व पक्षांना देण्यात आली. तेव्हा सर्व पक्षांच्या बुथ स्तरावरच्या एजंटने स्वाक्षरी केली आहे. याशिवाय कोट्यवधी मतदार आणि राजकीय पक्ष अजूनही हे काम करत आहेत.

डखठ मधील त्रुटी दर्शवण्यासाठी १ सप्टेंबरपर्यंतचा कालावधी मर्यादीत आहेत. त्यामुळे पुढच्या १५ दिवसांत सर्व राजकीय पक्षांना त्रुटी सांगण्याचं आवाहन निवडणूक आयोगाने केलं आहे. या कामासाठी प्रत्येक पक्षाचे जिल्हाध्यक्ष, बुथ लेव्हलचे एजंट काम करत आहेत. पण त्याच पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांपर्यंत बरोबर माहिती पोहोचत नाही. किंवा त्याकडे दुर्लक्षित करुन भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. राहुल गांधीनी दाखवलेली सर्व आकडेवारी खोटी आहे. मतदारांच्या आरोपांच्या पिंजऱ्यात उभे करणं सहन केलं जाणार नाही. सात दिवसांत प्रतिज्ञापत्र सादर करा अन्यथा देशाची माफी मागा. अनेक मतदारांनी डबल मतदार केल्याचा आरोप देखील खोटा आहे. ज्यांचं नाव मतदार यादीत नोंद आहे त्यांनीच मतदानाचा हक्क बजावला आहे.

कायद्यानुसार, त्रुटी योग्य वेळेत नमूद न करता मतचोरी सारख्या शब्दांचा चुकीच्या शब्दांचा वापर करुन भ्रम निर्माण करणे हा संविधानाचा अपमान नाही का? सुप्रीम कोर्टाने २०१९ मध्ये मतदारांच्या गोपनीयतेबाबत भाष्य केलं आहे. असं असताना काही मतदारांचे फोटो दाखवण्यात आले. आपल्या आई, बहीण, मुलींचे सीसीटीव्ही फुटेज निवडणूक आयोगाने समोर आणावेत का? असा सवाल निवडणूक आयोगाने केला.

निवडणूक प्रक्रियेत लाखो बुथ एजंट, पोलिंग एजंट आणि १ कोटी कर्मचारी काम करतात. अतिशय पारदर्शक प्रक्रिया होते. या प्रक्रियेत कुणी मतचोरी करु शकतं का? असा सवालही निवडणूक आयोगाने केला. निवडणूक आयोग अशा आरोपांना घाबरत नाही. देशाच्या सर्व जातीच्या आणि घटकेच्या जनतेच्या मागे निवडणूक आयोग काल, आज आणि उद्याही पहाडासारखा उभा राहील.

# जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशमध्ये ढगफूटी ; सात जणांचा मृत्यू





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

किश्तवाड : जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशमध्ये रविवारी ढगफूटी झाली. ढगफूटी झाल्याची ही जम्मूमधील तीन दिवसांतील दुसरी घटना आहे. आज रविवारी पुन्हा एकदा कठुआ जिल्ह्यात ३ ठिकाणी ढगफूटी झाली. ढगफूटीमुळे ७ लोकांचा मृत्यू झाला असून अनेकजण जखमी झाले आहेत. जिल्ह्यातील राजबाग परिसरातील जोड व्हॅलीमध्ये शनिवारी आणि रविवारी रात्रीच्या दरम्यान ढगफुटी झाल्याने गावाकडे जाणारा रस्ता पूर्णपणे उद्ध्वस्त झाला.

तर काही भागात दरड कोसळल्याच्या घटना घडल्या. दरड कोसळल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. घरांमध्ये पाणी शिरलं असून अनेक घरात मातीचा ढीग साचला आहे. दरड कोसळल्याच्या ठिकाणी जवळपास ६ लोक ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली गेली आहे.

त्याशिवाय ढगफूटी आणि दरड कोसळल्याने रेल्वे ट्रॅक आणि राष्ट्रीय महामार्गांचं नुकसान झालं आहे. नागरी प्रशासन, लष्कर आणि निमलष्करी दलांनी तातडीने बचाव कार्य सुरू केलं आहे. प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेऊन आहे.किश्तवाडमध्ये काही दिवसांपूर्वी ढगफुटीमुळे आलेल्या मोठ्या आपत्तीनंतर काही दिवसांतच कठुआमध्ये ढगफुटी झाली आहे. रविवारी कठुआ जिल्ह्यातील जोड भागात ढगफुटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. अनेक घरं ढिगाऱ्याखाली कोसळली आहेत. कठुआ जिल्ह्यात भीषण परिस्थिती असून युद्ध पातळीवर बचावकार्य सुरू आहे.

# प्रस्ताव सादर करा, खंडपीठही लवकरच करू : सरन्यायाधीश भूषण गवई



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : राज्याच्या सीमेवरील दुर्गम भागातील सर्वसामान्य पक्षकारांना न्याय मिळण्यासाठी कोल्हापूर बेंचची निर्मिती होत आहे. ही न्याय व्यवस्था वकिलांसाठी नव्हे, तर गोरगरीबांसाठी उपलब्ध होत आहे. याठिकाणी शाहू महाराजांच्या विचारांप्रमाणे समानतेचे न्यायदान करा, असे आवाहन करतानाच सर्किट बेंच तयार झाले आहे. आता खंडपीठ उभारणीसाठी उच्च न्यायालयाने प्रस्ताव सादर करावा, ती मागणीही लवकरच पूर्ण होईल, असे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी आज येथे केले.

**सरन्यायाधीश भूषण गवई हेच बेंचचे शिल्पकार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

कोल्हापूर सर्किट बेंचचे खंडपीठात रूपांतर लवकरच होईल, त्यादृष्टीने मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अलोक अराधे यांनी प्रयत्न करावेत, पायाभूत सुविधांसाठी मुख्यमंत्री तयार आहेत. सर्किट बेंचचे नियमित खंडपीठात रूपांतर होण्यासाठी जे काही लागणार आहे, त्याची पूर्तता उच्च न्यायालयाने लवकरात लवकर करावी, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचच्या इमारतीच्या उद्घाटनानंतर कोल्हापूर येथे आज मेरी वेदर क्रीडांगणावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य न्यायाधीश आलोक आराधे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तसेच पालकमंत्री प्रकाश आबिटकर, न्यायमूर्ती चंद्रशेखर, न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, न्यायमूर्ती एम. एस. कर्णिक, न्यायमूर्ती रविंद्र व्ही. घुगे, खासदार शाहू महाराज छत्रपती, ड. संग्राम देसाई (सदस्य, बार कौन्सिल महाराष्ट्र व गोवा), कोल्हापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ड. विजयराव पाटील, न्यायमूर्ती भारती डांगरे, न्यायमूर्ती मनीष पितळे, न्यायमूर्ती अनिल किलोर, न्यायमूर्ती शिवकुमार दिगे, न्यायमूर्ती शर्मिला देशमुख, न्यायमूर्ती गौतम ए. अंखड, न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर, न्यायमूर्ती शाम चांडक, राज्याचे डव्होकेट जनरल डॉ. बिरेंद्र सराफ, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया अनिल सी. सिंग, डव्होकेट जनरल गोवा राज्य देविदास पंगम, बार कौन्सिल महाराष्ट्र व गोवाचे अमोल सावंत, बार कौन्सिल महाराष्ट्र व गोवा सदस्य ड. वसंतराव भोसले, ड. विवेकानंद घाटगे, अध्यक्ष, डव्होकेट्स असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया ॲड. प्रशांत रेळेकर, बार कौन्सिल महाराष्ट्र व गोवा सदस्य ॲड. मिलिंद एस. थोबडे उपस्थित होते. याशिवाय राज्यमंत्रीमंडळातील मंत्री, राज्यमंत्री, खासदार, आमदार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर पुन्हा डागली तोफ

## बिहारमध्ये 'मतदार अधिकार यात्रा' सुरु

# महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत घोळ झाल्याचा आरोप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पाटणा : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज पुन्हा एकदा केंद्रीय निवडणूक आयोगावर तोफ डागली. राहुल गांधी यांच्याकडून सातत्याने निवडणूक आयोगाव मतचोरीचे आरोप केले जात आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतचोरी झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. विशेष म्हणजे राहुल गांधी यांची बिहारमध्ये आजपासून 'मतदार अधिकार यात्रा' सुरु झाली आहे. या यात्रेच्या पहिल्याच दिवशी राहुल गांधी यांनी महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत घोळ झाल्याचा आरोप केला. त्यांनी यात्रेच्या पहिल्या दिवशी महाराष्ट्राच्या मतदार यादीतील कथित घोटाळ्याचा मुद्दा उपस्थित केला.

महाराष्ट्रातील सर्व ओपिनियन पोलमध्ये इंडिया आघाडी जिंकणार असं सांगत होतं. लोकसभेला आमची आघाडी जिंकली होती. चार महिन्यातच विधानसभा निवडणुका झाल्या आणि भाजपची महायुती जिंकली. आम्ही थोडी चौकशी केली. लोकसभा निवडणुकीनंतर निवडणूक आयोगाने जादू करुन १ कोटी मतदार तयार केले, असा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला.

भाजपचे लोक पत्रकार परिषद घेतात तर त्यांच्याकडून निवडणूक आयोगाने कोणतंही शपथपत्र मागितलं नाही. माझ्याकडून मागितलं. म्हणाले, तुम्ही जी माहिती दिली त्याबाबत शपथपत्र द्या. त्यांचाच डेटा आहे. त्यांचेच आकडे आहेत अन् माझ्याकडून प्रतिज्ञापत्र मागत आहेत. आम्ही त्यांच्याकडून सीसीटीव्ही व्हिडीओग्राफी मागितले. त्यांनी त्यास नकार दिला. मी या मंचावरुन सांगतो, संपूर्ण देशात विधानसभा आणि लोकसभा निवडणुका चोरी केल्या जात आहेत, असा देखील आरोप राहुल गांधी यांनी केला.

राहुल गांधी यांच्या सर्व आरोपांना निवडणूक आयोगाने आज दुपारी तीन वाजता पत्रकार परिषद घेत प्रत्युत्तर दिलं. सर्व राजकीय पक्षांची निवडणूक आयोगात नोंदणी होते. त्यानंतर त्यांना निवडणुकीच्या कार्यप्रणातील सहभागी होते. सर्वांची नोंदणी निवडणूक आयोगात होते त्यामुळे निवडणूक आयोग कोणत्याही पक्षासोबत भेदभाव करत नाही. निवडणूक आयोगासाठी सर्व पक्ष सारखे आहेत, असं निवडणूक आयोगाने म्हटलं. तसेच राहुल गांधी मतचोरी सारख्या शब्दाचा वापर करुन भ्रम निर्माण करत आहेत. हा संविधानाचा अपमान आहे, असं प्रत्युत्तर निवडणूक आयोगाने दिलं आहे.

राहुल गांधी यांच्याकडे पुरावे असतील तर त्यांनी प्रतिज्ञापत्र सादर करावं. त्यांनी सादर केलेली सर्व आरोपी खोटी आहे. मतदारांना आरोपांच्या पिंजऱ्यात उभे करणे चुकीचं आहे. त्यामुळे राहुल गांधींनी सात दिवसांत शपथपत्र सादर करावं किंवा देशाची माफी मागावी असं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. तसेच निवडणुकीत १ कोटी कर्मचारी, लाखो बुथ एजंट आणि पोलिंग एजंट कार्यरत असतात. अत्यंत पारदर्शक अशी निवडणूक होते. तरीही मतचोरीचे आरोप कसे केले जाऊ शकतात? असा सवालही निवडणूक आयोगाने उपस्थित केला आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### आरोपावर प्रत्युत्तर

देशाच्या राजकारणात सध्या मोठ्या घडामोडी सुरु आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याकडून केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यप्रणालीवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. बिहार ईव्हीएमच्या मुद्द्यावरुन राहुल गांधी यांच्याकडून निवडणूक आयोगावर अतिशय गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवेळी मतचोरी झाल्याचा गंभीर आरोप राहुल गांधींनी केला आहे. केवळ महाराष्ट्रच नाही तर कर्नाटकाच्या निवडणुकीतही मतचोरी झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. या दरम्यान बिहार एसआयआर प्रकरणी सुप्रीम कोर्टात नुकत्याच पार पडलेल्या सुनावणीत कोर्टाने सर्व मतदारांची यादी जाहीर करण्याची सूचना निवडणूक आयोगाला दिली होती. दुसरीकडे निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना प्रतिज्ञापत्राद्वारे आपल्या आरोपांबाबतची माहिती अधिकृतपणे निवडणूक आयोगाकडे सादर करण्याचं आवाहन केलं होतं. तसेच पुराव्यांची देखील मागणी केली होती. या सगळ्या आरोप-प्रत्यारोपांच्या गदारोळानंतर निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेतली. केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी यावेळी भूमिका मांडली. प्रत्येक राजकीय पक्षाची नोंद ही केंद्रीय निवडणूक आयोगात होत असते. त्यामुळे निवडणूक आयोगासाठी प्रत्येक पक्ष सारखे आहेत. निवडणूक आयोग याबाबत कोणताही भेदभाव करत नाही. गेल्या दोन दशकांपासून विविध राजकीय पक्षांकडून मतदार सूचींमध्ये काही त्रुटी असल्याची तक्रार करण्यात येत होती.

# पंढरपूर अर्बन बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

## मागील आर्थिक वर्षात ३८.४२ कोटी ढोबळ नफा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर अर्बन बँकेस सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रू.३८.४२ कोटी रूपयांचा ढोबळ नफा झाला असल्याची माहिती बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी ११३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये दिली. यावेळी त्यांनी शासनाच्या व्याज परतावा योजनांची कर्जाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

बँकेची ११३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेच्या कर्मयोगी सभागृह, शाखा नवीपेठ, पंढरपूर येथे गुरूवार दि.१४ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली, याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी बँकेचे कुटुंबप्रमुख मा.आ.प्रशांत परिचारक तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संखने उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितीत सभासदांचे प्रशिक्षण पार पडले.

प्रास्ताविकात बोलताना बँकेचे चेअरमन सतीश मुळे म्हणाले की, प्रधान कार्यालय व ३० शाखासह कार्यरत असणारे आपलया बँकेच्या आर्थिक वर्ष मार्च २०२५ अखेर ठेवी रू.१३९१.४७ कोटी, कर्जे रू.९१६.२४ कोटी असून एकूण रू.२३०७.७१ कोटी इतका मिश्र व्यवसाय झाला असून तरतूदी वजा जाता निव्वळ नफा रू.२.२० कोटी झाला आहे. सभासदांच्या, ग्राहकांच्या विश्वासावरच बँक व्यवसायवृध्दी करीत आहे. २०२४-२५ या अहवाल सालात वैधानिक लेखापरिक्षक यांनी तपासणी केली असून बँकेचा सीआरएआर हा १३.८७% इतका तर मार्चच्या तुलनेत जून अखेर थकबाकी प्रमाण ३.३३% पर्यंत खालील आणणेत बँकेला यश प्राप्त झाले आहे. बँकेने अंतर्गत लेखापरिक्षण आणखी कडक केले आहे. कर्ज योजनांना ८.५०% पासून व्याजदर असून त्याचा लाभ सभासदांनी घ्यावा असेही सांगितले.

सोलापूर जिल्ह्याची अर्थवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर येथील दि पंढरपूर अर्बन को-ऑप.बँक लि.पंढरपूरने लहान-मोठे व्यवसायिक, व्यापारी व उद्योजक यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणेसाठी शासनाच्या विविध व्याज परतावा कर्ज योजना ज्यामध्ये आण्णासाहेब पाटील महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गिय महामंडळ, तसेच आई, अमृत अशा विविध समाजामधील व्यावसायिक बांधवाच्या व्यवसायवृध्दीसाठी व्याज परतावा योजनांद्वारे बँकेमार्फत कर्ज वाटप करीत आहे. यासाठी बँक शासनाकडून व्याज परतावा मिळतो तितकेच व्याजाने बँक कर्ज वाटप करीत आहे. यामध्ये एकही कर्ज थकीत गेले नसून शासनामार्फत नियमीत परतावा कर्जदारांना मिळत आहे असेही यावेळी बोलताना ते म्हणाले. यावेळी लाभार्थ्यांचा सत्कार करणेत आला.

बँकेचे कुटूंबप्रमुख मा.आमदार प्रशांतराव परिचारक यांनी कोरोना काळातील अडचणी मधून बँकेचे नवनियुक्त संचालकांनी वसुली कामकाज पाहात आज थकबाकी कमी करणेत यश मिळविले असून लाभांशासाठी रिझर्व्ह बँकेकडे बँकेने प्रस्ताव दाखल केला असून मान्यता आल्यावर वितरीत करणेत येणार असल्याचे सुतोवाच केले.

अहवाल वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे यांनी केले. त्यावेळी डॉ.अनिल जोशी, श्री.सुभाष भोसले यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देणेत आली, त्यांनीही बँकेच काम समाधानकारक असल्याचे नमूद केले. बँकेचे व्हाईस चेअरमन सौ.माधुरीताई जोशी यांनी पसायदानाने सभेची सांगता केली.

यावेळी बँकेचे संचालक राजाराम परिचारक, रजनीश कवठेकर, हरिष ताठे, पांडुरंग घंटी, शांताराम कुलकर्णी, विनायक हरिदास, अमित मांगले, अनंत कटप, गणेश शिंगण, ऋषिकेश उत्पात, व्यंकटेश कौलवार, संगिता पाटील, अनिल अभंगराव, गजेंद्र माने, अतुल कौलवार, प्रभुलिंग भिंगे, उदय उत्पात, सोमनाथ होरणे, शुभम लाड तसेच बँकेचे सर्व सभासद, ग्राहक, हितचिंतक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# श्रीमंत सुधाकरपंत परिचारक यांच्या पाचव्या पुण्यस्मरण निमित्त विविध सामाजिक कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : स्वर्गीय सुधाकर पंथानंतर पांडुरंग परिवार यांचे पुतणे प्रशांतराव परिचारक, उमेश परिचारक व त्यांच्या नेतृत्वाखाली काम करत आहेत, व त्यांचे नातू प्रणव, ऋषिकेश, रोहन, डॉक्टर प्रीतीश, हे सर्व समाजसेवेत कार्यरत आहेत.

खऱ्या अर्थाने सहकाराची गंगा घरोघरी पोहोचवणार आहे विलक्षण अवलिया म्हणजे कर्मवीर सुधाकरपंत परिचारक!! जिथे डोके टेकून नतमस्तक व्हावे अशी आदर्शची जागा म्हणजे सुधाकर पंत परिचारक शेतकऱ्यांच्या उत्कर्षाची भव्य दिव्यत्वाची मूर्ती म्हणजे आदरणीय मालक आणि मालकाने निर्गुण निरंकार स्वरूप पाहताच आमची कुर जुळून येतात कारण जिथे दिव्यत्वाची प्रचिती आपोआप होती त्यांच्या कार्याची दखल इतिहासाला सुद्धा घ्यावी लागेल व त्यांचे कार्य येणारे अनेक पिढ्यांनी प्रेरणादायी ठरेल असे महान विचारवंत आपल्या सर्वस्वाचा त्याग करून कोणत्याही गोष्टीची अपेक्षा न बाळगता सर्वसामान्य ची हित आणि त्यांचे कल्याण यातच आपले सर्व मानून निरंतर स्वतःला वाहून घेतलेले निष्कलंक कर्मयोगी म्हणजे मोठे मालक अनेक सहकारी संस्था यशस्वीपणे उभा राहून त्या नावावर रूपाला आणणारे सहकार सम्राट आणि अनेकांच्या हाताला काम देऊन जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन समाज कल्याणची काम केल्याने सर्वसामान्य जनतेच्या हृदयात निरंतर स्थान असणारे श्रीमंतयोगी आपल्या अखंड जीवनाच्या प्रवासात नेहमी शब्दाला जागणारी शब्दप्रभू विश्वासू आणि आधार यांची जिवंत उदाहरण म्हणजे मोठे मालक सहकारातील डॉक्टर महाराष्ट्राच्या राजकारणातील संत म्हणूनही त्यांची ओळख होती निष्कलंक चारित्र्यसंपन्न लोकनायक म्हणजे आदरणीय सुधारक पंत परिचारक मोठे मालक.

**मरावे परी किर्तिरूपी उरावे**

या काव्यातील स्वादेशात जीवन ते जगले. आयुष्यभर अत्यंत सादर राहून रयतेला श्रीमंत बनवणारा एकमेव किमयागार म्हणजे श्रीमंतयोगी आदरणीय सुधाकरपंत परिचारक मोठे मालक.

## किरकोळ कारणावरून विवाहितेचा छळ करत ठेवले उपाशी; पतीसह चौघांवर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : विवाहिता ही सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी मिळून किरकोळ कारणावरून शारीरिक व मानसिक त्रास देत आर्थिक छळ करत मारहाण करून उपाशी ठेवल्याची फिर्याद सुवर्णा श्रीधर तळभंडारे (वय-३५- ,रा.बुधवार पेठ,मिलिंद चौक) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती श्रीधर, सासू छाया, दिर उमेश, आनंद (सर्व. रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना जुलै २०२४ ते आजतागायत पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार गौडनवरू हे करीत आहेत.

# स्वातंत्र्यदिनी गजानन वायाळ यांनी केलेल्या एक दिवशी लाक्षणिक उपोषणाने प्रशासन खडबडून जागे, संबंधित विभागाच्या लेखी आश्वासनाने उपोषण सुटले




**मेरा सर्कल मधील सर्व रस्त्याचे प्रश्न मार्गी,पावसाळा संपताच रस्त्याच्या कामाला होणार सुरुवात.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चिखली तालुका प्रतिनिधी कैलास आंधळे : संपूर्ण भारतात ७९ व्या स्वातंत्र्य दिन उत्साहात चालू असतानाच दुसरीकडे स्वातंत्र्यदिनीच उपोषण करावे लागते एकीकडे उत्साही वातावरणात विकसित भारताचे स्वप्न दाखवायचे आणि दुसरीकडे दळणवळणाच्या दृष्टीने खेड्यापाड्याचे रस्ते हे शहरी भागाशी जोडल्या गेल्याने हे मुख्य रस्ते दळणवळणाच्या दृष्टीने मुख्य श्वास म्हणून ओळखले जातात मात्र ह्या रस्त्याची दयनीय अवस्थे बद्दल वाहनधारक व सर्वसामान्य नागरिकांकडून अनेक वर्षापासून ओरड होत होती. भारत विकसित राष्ट्र असल्याची ओरड सध्या कागदोपत्रीच असल्याचे भारताच्या ७९व्या स्वातंत्र्य दिनीच रस्त्याच्या मागणीसाठी उपोषण करावे लागत असल्याने हे सर्व दावे फोल ठरत तर नाही ना असा प्रश्न खेडोपाडी राहणाऱ्या तरुणाई पासून ते ७५ ओलांडलेल्या आजोबापर्यंत नेमकं स्वातंत्र्य कशाचं? अशा बोलक्या प्रतिक्रिया व्यक्त होत असतानाच.मेरा बुद्रुक सर्कल मधील अनेक महत्त्वाचे रस्ते अत्यंत खराब स्थितीत असल्याने रस्त्याची तात्काळ दुरुस्ती व्हावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गजानन संतोषराव वायाळ यांनी वेळोवेळी संबंधित विभागांना निवेदन देऊन सुद्धा त्या निवेदनावर कोणतीही कारवाई झाली नसल्याने दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्यदिनी सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालय मेरा बुद्रुक येथे भारतीय ध्वजाखाली बसताच संबंधित विभाग खडबडून जागे होऊन गजानन वायाळ यांच्या सर्व मागण्या लेखी स्वरूपात मान्य केल्याने गजानन वायाळ यांना एकदिवसीय लाक्षणीक उपोषण लिंबू सरबत देऊन सोडण्यात आले. गजानन वायाळ यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून रोहडा, कवठळ या ग्राम पंचायचे सरपंच, उपसरपंच व गावातील नागरिक सुद्धा रस्ता साठी एक दिवसीय लाक्षणिक उपोषणाला बसले होते.त्यांच्या सुद्धा संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मागण्या मान्य करून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष गजानन वायाळ यांच्या हाताने लिंबू सरबत देऊन त्यांचे सुद्धा उपोषण सोडवण्यात आले. संबंधित विभागाकडून अभियंता वाघ साहेब, आघाव साहेब,बडे साहेब, चेके यांनी वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या उपोषणात सर्व मागण्या लेखी स्वरूपात मागण्या मान्य करून पावसाळा संपताच सर्व रस्त्याचे काम चालू होतील व सध्याच्या परिस्थितीमध्ये तात्पुरती डागडूजी करण्यात येईल, जेणेकरून वाहनधारक व नागरिकांना त्रास होणार नाही. असे अधिकाऱ्यांनी दिव्य मातृछायाच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

**मागण्या मान्य झालेले रस्ते**

मेरा बुद्रुक फाटा ते मेरा बुद्रुक गाव, पिंपळगाव सोनारा ते मेरा बुद्रुक, मेरा खुर्द ते साखर खेर्डा, रोहडा फाटा ते तपोवन देवी मंदिर, भालगाव ते रोहडा गाव, कवठळ फाटा ते कवठळ गाव

## ग्रामीण कथाकार प्रा.भास्कर चंदनशिव यांना 'जीवनसाधना पुरस्कार' प्रदान

## 'गॅप इन क्लासरूम' मिटवण्याची गरज, कुलगुरू डॉ रजनीश कामत यांचे प्रतिपादन

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसराचा २१ वा वर्धापन दिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




छत्रपती संभाजीनगर : पुस्तकी ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान देणेही गरजेचे आहे. अलीकडच्या काळात विद्यार्थ्यांचा क्लासरूमपासून निर्माण झालेला गॅप दूर करून उपयोजित ज्ञान देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ रजनीश कामत यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसराचा २१ वा वर्धापन दिन शनिवारी (दि.१६) उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु प्राध्यापक डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर मुख्य सभागृहात कार्यक्रम झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. रजनीश के. कामत (कुलगुरु, डॉ. होमी भाभा विद्यापीठ, मुंबई) उपस्थित होते. कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. कार्यक्रमास प्र- कुलगुरू, डॉ.वाल्मिक सरवदे, व्यवस्थापन परिषद सदस्य बसवराज मंगरुळे, प्रा. डॉ.अंकुश कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. तर कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर आणि प्रभारी संचालक प्रा. डॉ. प्रशांत दीक्षित यांची व्यासपीठावर उपस्थित होती.

प्र- कुलगुरु डॉ. वाल्मिक सरवदे यांनी विद्यापीठ उपपरिसरच्या प्रगतीचा आढावा प्रास्ताविकात सादर केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव २००४ मध्ये सुरु झाले. शैक्षणिक वर्ष २०२४ २५ मध्ये १७ विद्यार्थ्यांनी नेट वसेट परीक्षेत यश मिळविले. तर १४ विद्यार्थ्यांना पी. एच. डी. प्रदान करण्यात आली, असे ते म्हणाले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या

प्रा. वेदकुमार वेदालंकार यांनी अनुवादित केलेल्या चार ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रमुख अतिथी . डॉ. रजनीश कामत यांनी उच्च शिक्षण व संशोधन या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले. मानवी जीवनास मूल्यांचे अधिष्ठान मिळणे महत्वपूर्ण आहे. वक्तृत्व हे आत्म्याच प्रतिबिंब असते. जनरेशन झेड या वर्गातील अनेक युवक आहेत. वैयक्तिक आव्हाने समजून घेऊन, विद्यार्थांना शिकविले पाहिजे. ओपन एआय च्या जगात आपण आहोत. शिक्षण पद्धतीत नविन प्रवाह येत आहेत. दोन्ही मेंदूचा समतोल उपयोग केला तर विद्यार्थी यशस्वी होतो. शिकणे शिकविण्याच्या पद्धतीत बदल घडविणे आवश्यक आहे. एकाग्रतेचा कालावधी निश्चित असतो. शिक्षण म्हणजे मनुष्याच्या आतमध्ये जे पूर्णत्व आहे, त्याला चालना देण्याचे काम शिक्षण करित असते. जीवनात मुल्य अतिशय महत्त्वाचे आहे. शिक्षणावर जीडीपी सहा टक्के इतकी रक्कम खर्च होणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले. सृजनशीलता, सहकार्य, समीक्षात्मक विचार, संभाषण कौशल्य इ. विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणे आवश्यक आहे, असे त्यांनी म्हटले. आऊटलुक रॅंकिंग मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास तिसरे स्थान मिळाल्याबद्दल त्यांनी अभिनंदन केले.

विद्यापीठाच्या गौरवशाली वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सुप्रसिद्ध कथाकार, समीक्षक प्रा. भास्कर चंदनशिव यांना मान्यवरांच्या हस्ते 'जीवनसाधना पुरस्कार'ने सन्मानित करण्यात आले. डॉ. गणेश शिंदे यांनी सन्मानपत्राचे वाचन केले.

पुरस्कार देऊन सन्मानित केल्याबद्दल ग्रामीण कथाकार प्रा. भास्कर चंदनशिव यांनी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी म्हटले की साहित्य मूल्यांच्या संवर्धना शिवाय जगत नाही. प्रत्येक कलाकृतीची एक रचना असते. विचार मांडणे आणि विचार जगणे या दोन्ही गोष्टी महत्वाच्या आहेत. रानसय हे पुस्तक व्यक्तीगत जीवनावर आधारित आहे, असे ते म्हणाले.कथांचे मुल्य महत्वाचे आहेत. सहा कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. लिहिण आणि वाचण या दोन्ही गोष्टी महत्वाच्या आहेत. आपल्या मुल्यांशी, जगण्याशी निगडित आहेत. चित्रकलेची आवड होती. त्यांनी सन्मानित केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कुलगुरू

प्राध्यापक डॉ. विजय फुलारी यांनी अध्यक्षीय समारोप केला. एकविसाव्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या, विद्यापीठाच्या वतीने प्रा. वेदकुमार वेदालंकार यांचे अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्यात आले. त्यांची मुळ लेखन प्रेरणा ग्रामीण जीवनाशी निगडित आहे. संशोधनात मुलभूत संकल्पनेशी ठाम राहिले पाहिजे. तळमळीने संशोधन झाले पाहिजे. स्थानिक प्रश्नावर संशोधन झाले पाहिजे. सर्वांनी झोकून देऊन काम केले पाहिजेत. अशा प्रकारचे संशोधन झाले पाहिजे, की समाजाला, विद्यार्थांना फायदा झाला पाहिजे. संशोधन पद्धत विकसित झाली पाहिजे. विद्यार्थी संख्या वाढली पाहिजे. आत्मियतेने सर्वांनी काम केले पाहिजे. प्राध्यापक, कर्मचारी विद्यार्थी यांनी कठोर मेहनत करुन, संस्था नावारूपास आणली पाहिजे. उपपरिसराचे नाव देशात होईल, असे विचार त्यांनी केले व्यक्त केले. डॉ. महेश्वर कळलावे यांनी सूत्रसंचालनव तर कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. वेदकुमार वेदालंकार, व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. गजानन सानप, डॉ. संजय साळुंके, , डॉ. वैशाली खापर्डे, अधिष्ठाता, डॉ. गौतम पाटील, डॉ. भारत खंदारे, डॉ. रविकिरण सावंत, नितीन जाधव ऍड. दत्तात्रय भांगे, डॉ. योगिता होके पाटील, डॉ. व्यंकट लांब, डॉ. अपर्णा पाटील, काशिनाथ देवधर, अधिसभा सदस्य देविदास पाठक, डॉ संजय कांबळे, सतीश गावीत, डॉ. बाबासाहेब डोळे, सविता जंपावाड, रविंद्र काळे, नितीन जाधव, प्राचार्य आबासाहेब देशमुख, डॉ. रमेश दापके, डॉ .जयसिंगराव देशमुख, एम. डी. देशमुख, भा.न. शेळके, प्रा. संदीप देशमुख, माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, डॉ. प्रशांत चौधरी, एम. डी. गायकवाड, नितीन बागल यांच्यासह विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# निफाड नगरपंचायत व निफाड पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मॅरेथॉन रॅली निफाड येथे संपन्न

## अबाल-वृद्धांसह तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग; मान्यवरांकडून हिरवा झेंडा दाखवून मॅरेथानॅ रॅलीला सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत व निफाड पोलीस स्टेशन नाशिक ग्रामीण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ड्रग्स व अमली पदार्थ विरोधी जनजागृती मॅरेथॉन रॅलीस ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, यांचे संकल्पनेतून अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शनाखाली निफाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी कांतीलाल पाटील व पोलीस निरीक्षक गणेश गुरव तसेच आमदार दिलीप बनकर, नगरपंचायत चे प्रभारी नगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे, मुख्याधिकारी धीरज भामरे



यांचे प्रमुख उपस्थितीत अमली पदार्थ विरोधी जनजागृती मॅरेथॉन रॅलीचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या वेळी शांतीनगर चौफुली येथून या मॅरेथॉन रॅलीला उपस्थित प्रमुख मान्यवरांनी हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. उगाव रोड ते शिवडी रेल्वे गेट यादरम्यान.या



स्पर्धा पार पडल्या यामधून एक ते पाच असे क्रमांक काढून विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्र ट्रॉफी व पुष्प-गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले, ड्रग्सचे सेवन केल्याने होणारे दुष्परिणाम गुन्हेगारीला मिळणारे खतपाणी, व समाजातील तेढ या सर्वांना आळा घालण्यासाठी नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी सुरू केलेला उपक्रम स्तुत्य ठरत आहे.

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांना व नागरिकांना ड्रग्समुक्त तसेच अंमली पदार्थ विरोधी शपथ पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी उपस्थितांना देऊन योग्य संदेश दिला, या वेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले, या उपक्रमात नगरसेवक नगरसेविका नागरिक शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निफाड पोलीस स्टेशन व निफाड नगरपंचायत चे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

यावेळी निफाड नगरपंचायतचे नगरसेवक नगरसेविका तसेच निफाड पोलीस स्टेशनचे कर्मचारी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले.

# एकच मिशन मराठा आरक्षण मोर्चा संदर्भात ढवळस येथे बैठकीचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा तालुक्यातील ढवळत गावात संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मराठा आरक्षणासाठी निघणाऱ्या २९ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई मोर्चा संदर्भात बैठकीची आयोजन करण्यात आली होते सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिनिधी पूजन करण्यात आले. सदर बैठकीचे अध्यक्ष स्थान माजी मुख्याध्यापक शिवश्री देवाप्पा हेंबाडे, माजी सरपंच शिवश्री आबासाहेब मोरे, व प्रमुख मार्गदर्शक पाहुणे मंगळवेढा सकल मराठा समाज समन्वयक शिवश्री प्रकाश मुळीक सर, वारी परिवार संस्थापक अध्यक्ष शिवश्री सतीश दत्तू, यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली.

यावेळी प्रमुख पाहुणे मंगळवेढा सकल मराठा समाज समन्वयक शिवश्री प्रकाश मुळीक सर यांचा सत्कार माजी मुख्याध्यापक शिवश्री देवाप्पा हेंबाडे, वारी परिवार संस्थापक अध्यक्ष शिवश्री सतीश दत्तू यांचा सत्कार उद्योजक शिवश्री रवींद्र हेंबाडे, यांच्या शुभहस्ते गुलाब पुष्प देऊन करण्यात आला मराठा आरक्षणासाठी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली २९ ऑगस्ट मुंबई मोर्चा संदर्भात आज बैठकीत खालील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.गावातील प्रत्येक मराठा बांधवांच्या घरी जाऊन पत्रके व तांदूळ वाटप करणे आपल्या गावामध्ये मेन चौकात मोठा डिजिटल बोर्ड लावणे मोर्चाच्या तयारीसाठी वारंवार मीटिंग बोलवणे हे घर एक गाडी याचं नियोजन करणे. गावातील श्रीमंत व नेतेमंडळी कडून मोर्चासाठी लागणारी आर्थिक मदत घेणे टू व्हीलर व फोर व्हीलर वरती स्टिकर चिटकवणे.

शिक्षक व डॉक्टर, इंजिनियर, नोकरदार तसेच उद्योगपती यांच्याकडून चार चाकी गाडीची उपलब्धता करणे आपल्या मित्रांना व नातेवाईकांना आरक्षणाची महत्त्व समजावून सांगून मुंबई मोर्चासाठी वारंवार फोन करणे व त्यांना प्रवृत्त करणे फेसबुक व्हाट्सअप व ळपीीरसीरा तसेच इतर सोशल मीडियावरती मोर्चा संदर्भातील पोस्ट आज पासून दररोज वायरल करणे ही लढाई आरपारची अंतिम आहे त्यामुळे इतर कामे बाजूला सारून समाजाच्या भविष्यासाठी वेळ देणे आवश्यक आहे आधी विषय यावर अतिशय सविस्तर चर्चा झाली असून तरी आपल्या ढवळत गावातील मराठा बांधव जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी ब्रिगेड मंगळवेढा तालुका अध्यक्ष शिवश्री आनंद मोरे यांनी तर आभार प्रदर्शन विकास सेवा सोसायटी संचालक शिवश्री नवनाथ हेंबाडे यांनी केले.

# विश्वशांती गुरुकुलमध्ये ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाखरी, पंढरपूर : एमआयटी विश्वशांती गुरुकुल मध्ये ७९ वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात विश्वशांती गुरुकुल स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कर्नल मेजर हरी लक्ष्मण बोंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर राष्ट्रगीत आणि शिस्तबद्ध संचलन झाले. आपल्या भाषणात कर्नल भोंगे यांनी भारतीय संविधानातील मूल्यांवर भर देत, युवकांनी राष्ट्रनिर्मितीत योगदान देण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य आणि नाटिका सादर करून भारताची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि लोकशाही मूल्यांचे दर्शन घडवले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे प्राचार्य श्री. शिवाजी गावळी यांनी केले आणि प्रमुख पाहुण्यांची आओळख करून दिली. यावेळी कॉलेजचे





प्राचार्य डॉ. स्वप्नील शेंठ, हेडमिस्ट्रेस श्रीमती शिबानी बॅनर्जी, तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रदर्शन अरिफ सर यांनी केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना अधिक दृढ झाली.



# राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाकडुन कु.प्राजक्ता माळी आणि छत्रपती बाकले यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंबप्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील कु प्राजक्त अंगद माळी हिचा मिरज शासकीय मेडिकल कॉलेजमध्ये तर चि.छत्रपती शिवराज बाकले याचा धुळे येथील मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश निश्चित झाल्याबद्दल राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य सरचिटणीस तथा राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष श्री संतोष भोजने, ओबीसी महासंघाचे



जिल्हा उपाध्यक्ष सावता माळी, सरचिटणीस श्री सतीश वैद्य यांनी सत्कार केला.यावेळी गावचे उपसरपंच दयानंद पाटील अमर शेळके, ज्ञानेश्वर माळी, सर्जेराव बाकले, दिलीप शेळके, सुनील माळी, संदीप जाधव, युवराज माळी, सतीश पाटील, प्राजक्ता माळी चे आईवडील, आजी आजोबा तसेच बाकले कुटुंबीय उपस्थित होते. भविष्यात चांगले डॉक्टर बनुन गोरगरीब जनतेसाठी चांगल्याप्रकारे रुग्णसेवा आपल्या कडून घडावी अशी अपेक्षा यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# लोकप्रिय आमदार डॉक्टर भाई बाबासाहेब देशमुख यांनी आरोग्यमंत्र्या बरोबर केली विविध कामाबाबत चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री नामदार प्रकाशजी आबिटकर साहेब यांची लोकप्रिय आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी मुंबई ते भेटून सांगोला विधानसभा मतदारसंघातील आरोग्य सुविधा बाबत अनेक प्रश्नावर चर्चा केली.

त्यामध्ये सांगोला शहरातील बहुचर्चित ट्रामा केअर सेंटर सुरू करण्याबाबत चर्चा ड्रामा केअर सेंटर यंत्रसामुग्री कर्मचाऱ्यांचे योग्य बाबत चर्चा केली. नवीन आरोग्य केंद्र उपकेंद्र यांच्या बाबत ही चर्चा केली.

तसेच भाळवणीचे आरोग्य रुग्णालय बंडी शेगाव येथे शिफ्ट होणारी प्राथमिक आरोग्य केंद्र लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी केली. अशा अनेक आरोग्य सुविधा याबाबत प्रश्नावर चर्चा केली आमदार भाई बाबासाहेब देशमुख . यांनी चर्चा केली.

# उपजिल्हा रुग्णालय एच. आय .व्ही. संसर्गितासाठी रेशीमगाठी वधू वर परिचय मेळावा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जिल्हा प्रतिबंधक व नियंत्रण केंद्र सोलापूर ए.आय.टी. पंढरपूर सोलापूर, बार्शी एन एस ओ पी प्लस समग्र प्रकल्प पंढरपूर, सोलापूर सर्व आय.सी.टी.सी. केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने एच.आय. व्ही. संसर्गित मुला मुलीं करिता रेशमगाठी वधू वर परिचय मेळावा उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे संपन्न झाला.

या परिचय मेळावा करिता महाराष्ट्रातील प्रत्यक्ष कार्यक्रम स्थळे इच्छुक उमेदवारांची १७७ वधूवरांची नोंदणी झाली. या मेळाव्यात इच्छुक वधू वरांबरोबर त्यांचे नातेवाईक सह साडेचारशे ते पाचशे नागरिक उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवर डॉक्टर दीपक धोत्रे वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर, यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन तथा डॉक्टर सयाजी गायकवाड वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉक्टर प्रदीप केचे, डॉक्टर प्रसन्न भातलवंडे, डॉक्टर बालाजी बिराजदार डॉक्टर संभाजी भोसले डॉक्टर अविनाश उईके, डॉक्टर वनिता कार्यकर्ते डॉक्टर खुपसंगीकर जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री कृष्णा सकट, कार्यक्रम व्यवस्थापक श्री समाधान माळी समग्र प्रकल्प पंढरपूर सोलापूर यांच्या शुभहस्ते दीप प्रजनन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मध्ये वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉक्टर सयाजीराव गायकवाड यांनी एआरटी सेंटरचे कामकाज व औषध उपचाराबाबत सविस्तर माहिती दिली.या मेळाव्याचे आयोजन व महत्त्व व पुणे ते ची काळजी घेऊन इच्छुक वधू-वरांचा सविस्तर परिचय परस्पराचे विचार विनिमय करिता पुरेसा वेळ व जागा उपलब्ध करून देऊन जवळपास यापैकी नऊ ते दहा विवाह जुळून येण्याची खात्री वाटते. कुटुंबीयाशी विचार विनिमय करून नदीच्या काळात सहा ते सात विवाह जुळून येऊन एकूण अंदाज १५ अल्प कालावधीत पूर्णत्वास जातील सदरील विवाह सामुदायिक विवाह सोहळ्याकरिता प्रोत्सानासाठी प्रयत्न चालू आहेत या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले परिचय मेळाव्यात शुभेच्छा दिल्या अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर दीपक धोत्रे यांनी जोडीदाराची निवड व महत्त्व सांगत असताना नेहमी औषध उपचाराचे महत्व सांगितले. एच आय व्ही सवयीत रुग्णांना सर्वतोपरी औषध उपचार व मोफत रुग्णसेवा तसेच विविध शासकीय योजना देण्याबाबत सर्वत्र सहकार्य केले जाईल अशी ग्वाही दिली या मेळाव्याचे आयोजन उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले तसेच इच्छुक वधू-वरांना नवीन जोडीदार निवडण्याबाबत शुभाशीर्वाद दिले. या वधू वर मेळाव्या करिता साडेचारशे ते पाचशे सहभागी सर्व उमेदवार व नागरिकांसह नाष्टा व भोजनाची व्यवस्था पंढरपूर येथील सामाजिक संस्था पालवी प्रभा हिरा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा श्री माननीय मंगलताई शहा यांच्यामार्फत मोफत देण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समुपदेशक श्री पुरुषोत्तम कदम व आभार प्रदर्शन वैद्यकीय अधिकारी डॉक्टर अविनाश वुईके यांनी केले तसेच या कार्यक्रमास रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी बंद उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्री संतोष शेंडगे, बाजीराव नामदेव ,नागेश देवकर, दीपक गोरे, किशोर जाधव युवराज वांगी संदीप देशमुख सुभाष बळवंतराव गुलजार शेख एजाज बागवान भगवान भोसले, श्रीराम मीनाक्षी कदम ,स्वाती कसबे, रूपाली देवकर सुज्ञता गायकवाड ,राजश्री टकले, मेघा चंदनशिवे, बाळासाहेब पांढरे ,नंदकुमार कुंभार, सुनील चांदणे, तुकाराम साठे ,भारत सोनवणे ,विशाल शिंदे ,आदींनी परिश्रम घेतले.


**शेतकरी व कामगारांचा संयुक्त मेळावा**

# ‘निसाका’वर आज शेतकरी कामगारांची संघर्ष सभा

**मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने निफाड सहकारी साखर कारखान्याची उर्वरित जमीन व अन्य मालमत्ता तातडीने विक्री करण्याचे ठरवले असून त्या विरोधात कारखान्याचे शेतकरी, सभासद व कामगारांनी एल्गार पुकारला असून याबाबत विरोध व विचारविनिमय करण्यासाठी सोमवार दिनांक १८ रोजी सकाळी साडेनऊ वाजता कारखाना कार्यस्थळावर शेतकरी व कामगारांचा संयुक्त मेळावा आयोजित करण्यात आला आहे.



सन २०२२ ला २५ वर्षाच्या भाडेपट्ट्याने चालवायला दिलेला निफाड साखर कारखाना चौथ्या हंगामातही बंद आहे. कारखान्यात झालेल्या अनेक गैरव्यवहारांची चर्चा कारखाना कार्यक्षेत्रात जोरात सुरू आहे.

नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेला ड्राय पोर्ट साठी जमीन विक्रीद्वारे ७६ कोटी रुपये कर्जात जमा झाले असून सुद्धा बँकेने तातडीने कारखान्याची उर्वरित जमीन व मालमत्ता विक्रीचा घाट घातला आहे. कारखाना भाडेपट्ट्याचा पंचवीस वर्षाचा करार तसाच कार्यरत ठेवून उर्वरित जमीन व मालमत्ता काही विशिष्ट लोकांच्या घशात घालण्याचा डाव यातून स्पष्ट दिसतो. या कटकारस्थानाला प्राणांतिक विरोध करून आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी या संघर्ष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. कारखान्याचा भाडेपट्ट्याचा करार, जमीन विक्री व अन्य गैरव्यवहार यातून कारखान्याचे शेतकरी व कामगारांचे मोठे नुकसान झाले असून याविरुद्ध शेतकरी व कामगारांनी मोठा लढा उभारण्याचा निर्धार केला आहे.

निसाका बचाव संघर्ष समिती व निफाड साखर कामगार सभा यांच्याद्वारे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून कारखान्याचे शेतकरी, सभासद व कामगारांनी मोठ्या संख्येने मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते विविध विभागांच्या सन्मानपत्र व पुरस्कारांचे वितरण

## जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथील श्रीमती सुरेखा कोळी यांना पुणे महसूल विभाग स्तरावरील उत्कृष्ट महसूल सहाय्यक पुरस्कार प्रदान

**■ नक्षलग्रस्त जिल्ह्यात कर्तव्य बजावताना नक्षलवाद्यांच्या हिंसक व बेकादेशीर कारवायांना परिणाम कारकरित्या आळा घातल्याबद्दल पोलीस आयुक्त सोलापूर शहर कार्यालयाचे यंत्र संचालक (सफौ) संतोष देशपांडे यांना सन्मानित करण्यात आले**

**■ तालुका वैद्यकीय अधिकारी माढा डॉ. अविनाश खांडेकर यांचा तालुका वैद्यकीय अधिकारी गटात प्रथम क्रमांक**

**■ सर्वोत्कृष्ट अशा स्वयंसेविका पुरस्कार श्रीमती सुमिता राजगुरू**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : भारतीय स्वातंत्र्य दिना निमित मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी ठीक नऊ वाजून पाच मिनिटांनी करण्यात आले.

यावेळी शासनाच्या विविध विभागाचे पुरस्कार वितरण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

पोलिस अधिकारी कर्मचारी यांना त्यांचे क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेबाबत पारितोषिक देऊन गौरविण्यात आले-

पोलीस दलामध्ये उत्कृष्ट व उल्लेखनीय सेवा बजावल्याबद्दल राष्ट्रपती पदक मिळाल्याबाबत सहायक पोलीस आयुक्त राजन माने, भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासन यांच्याकडून विशेष सेवा पदक मंजूर करण्यात आल्याबद्दल पोलीस उपअधिक्षक ग्रामीण संकेत देवळेकर, भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासन यांच्याकडून शौर्यपदक मंजूर करण्यात आल्याबद्दल माढा पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरिक्षक माढा नेत-ाजी बंडगर, नक्षलग्रस्त जिल्ह्यामध्ये नेमणूकीस असताना नक्षलवाद्यांच्या हिंसक व बेकादेशीर कारवायांना परिणामकारक रित्या आळा घा-लून कर्तव्य बजावून विहित केलेल्या कालावधीत पूर्ण केल्याबद्दल पोलीस आयुक्त सोलापूर शहर कार्यालयाचे यंत्र संचालक (सफौ) संतोष देशपांडे, भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासन यांच्याकडून विशेष सेवा पदक मंजूर करण्यात आल्याबद्दल सोलापूर ग्रामीणचे बिनतारी संदेश विभागाचे पोलीस हवालदार औदुंबर टरले यांना पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

**मा.मुख्यमंत्री महोदयांचे म हत्वकांक्षी कार्यक्रम १०० दिवसांची कार्यालयानी सुधारणा विशेष मोहिम पुणे विभागातून निवडण्यात आलेली उत्कृष्ट कार्यालये-**

उपविभागीय अधिकारी कार्यालय माळशिरस, श्रीमती विजया पांगारकर, उपविभागीय कार्यालयात तृतीय क्रमांक, तालुका वैद्यकीय अधिकारी माढा डॉक्टर अविनाश खांडेकर, तालुका वैद्यकीय अधिकारी गटात प्रथम क्रमांक, तालुका वैद्यकीय अधिकारी माळशिरस डॉ. प्रियंका शिंदे, तालुका वैद्यकीय अधिकारी गटात द्वितीय क्रमांक, तालुका कृषी अधिकारी करमाळा देवराज चव्हाण तालुका कृषी अधिकारी गटात द्वितीय क्रमांक, वनपरिक्षेत्र अधिकारी सोल-ापूर रोहितकुमार गांगर्डे वनपरिक्षेत्र अधिकारी गटात तृतीय क्रमांक, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना वैराग श्रीमती रेश्मा पठाण प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना गटात तृतीय क्रमांक, बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) सोलापूर शहर पश्चिम दिपक ढेपे बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) गटात तृतीय क्रमांक, बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) सोलापूर शहर पुर्व विजय खोमणे बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) गटात द्वितीय क्रमांक, सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त तालुका लघु पशु सर्व चिकीत्सालय पंढरपूर तानाजी खांडेकर सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त लघु पशु सर्व विकीत्सालय गटात द्वितीय क्रमांक, उप अभियंता जलसंपदा उजनी कालवा उपविभाग क्र.१६ सोलापूर बाळास-ाहेब जाधव उप अभियंता जलसंपदा गटात प्रथम क्रमांक, उपविभागीय जलसंधारण अधिकारी मोडनिंब देवेंद्र कदम उपविभागीय उलसंधारण अधिकारी गटात द्वितीय क्रमांक, सहा निबंधक (सहकारी संस्था) उत्तर सोलापूर दत्तात्रय भवर सहा. निबंधक (सहकारी संस्था) गटात तृतीय क्रम ांक, उपकोषागार अधिकारी पंढरपूर विठ्ठल पाटील उपकोषागार अधिकारी गटात द्वितीय क्रमांक, तालुका क्रिडा अधिकारी अक्कलकोट नदीम शेख तालुका क्रिडा अधिकारी गटात तृतीय क्रमांक, उपजिल्हा रुग्णालय अकलुज डॉ. एम.एन. गुडे उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालय गटात प्रथम क्रमांक, उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर डॉ.महेश सुडके उपजिल्हा / ग्रामीण रुग्णालय गटात द्वितीय क्रमांक, उपजिल्हा रुग्णालय बार्शी डॉ.एस.ए.बोपलकर उपजिल्हा /ग्रामीण रुग्णालय गटात तृतीय क्रमांक, गट शिक्षण अधिकारी अक्कलकोट प्रशांत अरबळी गट शिक्षण अधिकारी गटात तृतीय क्रमांक, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सोलापूर, सुनिल हुसे जिल्हा ग्रंथालय अधिकारी गटात.

■ अवयवदान कार्यक्रमातील अवयव दात्या व्यक्तीचे नाव व सन्म ानपत्र प्राप्त व्यक्तींची नावे - अवयव दाता ओंकार महिंद्रकर सन्मानपत्र प्राप्त व्यक्ती अशोक रघुनाथ महिंद्रकर, अवयवदाता कृष्णहरी बोम्मा सन्म ानपत्र प्राप्त व्यक्ती गुरूम सत्यनारायण, अवयव दाता सपना निलेश चक्रे सन्म ानपत्र प्राप्त व्यक्ती निलेश चक्रे.

■ सर्वोत्कृष्ट अशा स्वयंसेविका पुरस्कार- जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, सोलापूर श्रीमती सुमिता राजगुरू आरोग्य विभागांतर्गत गाव पातळीवर आरोग्य सेवा लाभार्थीला देण्यामध्ये उल्लेखनीय काम केले. सर्वो त्कृष्ट आशा गट प्रवर्तक पुरस्कार जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, सोलापूर श्रीमती ज्योती चंद्रकांत विडेकर आरोग्य विभागांतर्गत गाव पातळीवर आरोग्य सेवा लाभार्थीला देण्यात उल्लेखनीय काम केले.

■ विभागस्तरीय शालेय क्रिडा स्पर्धा प्राविण्य मिळालेल्या खेळाडुचा सत्कार जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, सोलापूर सेंट जोसेफ हायस्कूल सोलापूर चि.राजवर्धन जाधव विभागीय शालेय क्रिडा स्पर्धेम ध्ये १४ वर्षाखालील मुले वयोगटातील मिडले रिले ४ बाय १०० (जलतरण सांघिक खेळ) मध्ये तृतीय क्रमांक मि ळाले, सेंट जोसेफ हायसकुल सोल-ापूर हर्षदा जाधव विभागीय शालेय क्रिडा स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील मुली वयोगटातील मिडले रिले ४ बाय१०० (जलतरण सांघिक खेळ) मध्ये तृतीय क्रमांक मिळाले.

राज्य गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव- शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद सोलापूर आदर्श पब्लिक स्कूल अकोलगांव ता.कुर्डूवाडी कुमारी काव्या निलेश देशमुख पुर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ५ वी मध्ये ग्रामीण भागातून ९५.९७% घेवून राज्याच्या गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले आहे, शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद सोलापूर, सुयश विद्यालय, बार्शी साक्षी दिनेश हाके पुर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८ वी मध्ये शहरी भागातून ९५.३३% घेऊन राज्याच्या गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले.

■ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून श्रीमती विमल शंकर साबळे यांना बागायत शेतजमीन वाटप करण्यात आली.

■ जिल्हाधिकारी कार्यालय सोल-ापूर येथील श्रीमती सुरेखा कोळी यांना पुणे महसूल विभाग स्तरावर उत्कृष्ट महसूल सहाय्यक म्हणून गौरविण्यात आले. याप्रकारे या प्रकारे स्वातंत्र्य दिनाच्या शुभप्रसंगी विविध विभागातील मान्यवर अधिकारी कर्मचारी तसेच विद्यार्थी यांना पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, राज्य राखीव दलाच्या समादेशक डॉ.दिपाली काळे, केगाव पोलिस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य विजयकुमार चव्हाण, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचारी तसेच स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# २५ वर्षे विना अपघात सेवा दिल्या बद्दल चालक वैभव कुलकर्णी यांचा व त्यांच्या पत्नीचा २५ हजार रुपये रोख व साडी चोळी देऊन सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : राज्य परिवहन महामंडळाच्या अक्कलकोट आगारात २५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी मध्ये विना अपघात सेवा दिल्या बद्दल सोला-पूर विभागातील अनेक चालकांचा सन्मान करण्यात आला यात अक्कलकोट आग-ाराचे चालक चालक वैभव कुलकर्णी चालक क्रमांक ४२८५७ यांचा ही २५ हजार रुपये रोख आणि सन्मान पत्र देऊन आणि त्यांच्या पत्नीस साडी चोळी देऊन स्वातंत्र्य दिनी म्हणजे शुक्रवार दिनांक १५ ऑगस्ट २५ रोजी सोलापूर येथील फौजदार चावडी पो-लीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राऊत यांच्या हस्ते सत्कार करून सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांच्या सह विभागीय वाहतूक अध-ीक्षक नकाते, विभागीय वाहतूक अधिकारी



अजय पाटील, विभागीय स्थापत्य अभियंता चौधरी यांच्यासह एस टी चे इतरही अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

गेल्या २५ वर्षात कसलाही अपघात न होऊ देता सलग २५, वर्षे एस टी चालवण-ारे अक्कलकोट आगार येथे कार्यरत असलेले चालक वैभव कुलकर्णी यांना २५ हजार रुपये रोख बक्षीस देऊन आणि शाल पांघरूण व प्रमाणपत्र देऊन त्यांचा आणि त्यांच्या पत्नीस साडी चोळीचा भरती आहेर देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी अक्कलकोट आगारातील ज्येष्ठ आणि सेवानिवृत्त झालेले संजय मनोहर जाधव चालक क्रमांक ३६१६२ तसेच अप्पू नडगरी चालक क्रमांक ३६३४४ आणि वैभव कुलकर्णी चालक क्रमांक ४२८५७ यांचा सपत्नीक सोलापूर येथील फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राऊत यांच्या हस्ते सत्कार करून सन्मानित करण्यात आले. अक्कलकोट आग-ारातील या तीन चालकांनी एस टी ची सुरक्षित प्रवाशी वाहतूक सेवा करून त्यांचे नाव केले आहेत तसे इतरही चालकांनी आपली नाव होण्यासाठी एस टी ची प्रवासी वाहतूक सेवा सुरक्षित देऊन आणि विमा अपघात करून करावी असे आवाहन अक्कलकोट एस टी चे आगार व्यवस्थापक रणजीत साळवे यांनी या तिघा चालकांना विना अपघात सेवा मेडल मि ळाल्या बद्धल अभिनंदन करताना केले आहे.

# अक्कलकोट आगारात उत्साहात ध्वजारोहण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट आगारात स्वातंत्र्य दिनानिमित आगार व्यवस्थापक रणजीत साळवे यांच्या हस्ते उत्साहात ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण झाल्या नंतर उपस्थित सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांना धूम्रपान न करण्याबाबत शपथ देण्यात आली. या प्रसंगी बोलताना आगार व्यवस्थापक रणजीत साळवे यांनी सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांनी सामूहिक रित्या योग्य नियोजन करून आणि परिश्रम घेऊन अक्कलकोट आगाराचे भारमान आणि के पी टी एल वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने यावेळी त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उत्कृष्ट कामगिरी पार पाडलेल्या आणि आदर्श काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार आगार व्यवस्थापक रणजीत साळवे यांनी केला. या वेळी कार्य शाळा अधीक्षक संजय कांबळे, अक्कलकोट आगाराचे वाह-तूक निरीक्षक पी.पी. हनगल, नागेश रोडगे, वाहतूक नियंत्रक मदन घाटगे, श्रीमंत खसगी माजी वाहतूक नियंत्रक विठ्ठल सोनकांबळे, आगार लेखाकार कोपा साहेब, वरिष्ठ लिपीक शिंदे शिफ्ट इन चार्ज एम के पाटील तसेच लिपीक प्रशांत



फडतरे, भगवान कल्याणकर अनिल पाटील, अक्षय बोलदे वाहन परीक्षक श्री वसंत बंडगर यांच्यासह राहुल स्वामी वाहन महेश गायकवाड व इतर अनेक कर्मचारी उपस्थित होते

# श्री माणकेश्वर वाचनालय स्वातंत्र्य दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड श्री माणकेश्वर वाचनालयात भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण समारंभ वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर बाबुराव शेलार यांच्या शुभहस्ते संपन्न* *झाला या प्रसंगी वाचनालयाचे उपाध्यक्ष डॉ मेघा जंगम, हिशोब तपासणीस दत्ता काका उगावकर, संचालक सुहास सुरळीकर, ग्रंथ मित्र नईम खान पठाण, बाळासाहेब कर्डिले, सुन-ील चिखले, माजी सरपंच रघुनाथ कुंदे, सभासद संजय घुमरे, अशोक पगारे, ग्रंथपाल नितीन बनसोडे, सहाय्यक ग्रंथपाल आरती जंगम, नंदकुमार पुंड, शिपाई अनिता इस्ते आदी उपस्थित होते.

# श्री क्षेत्र कानिफनाथ गड येथे दहीहंडी उत्सव पारंपरिक पद्धतीने उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : पुरंदर ::सालाबाद प्रमाणे श्री नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्ट बोपगांव आयोजित दहीहंडी उत्सव अतिशय आनंदी व उत्साही वा-तावरणात पार पडला.

दहीहंडी उत्सव हा महाराष्ट्रात मोठ्या उत्साहा त साजरा होण-ारा एक पारंपरिक उत्सव आहे. कृष्णाच्या बालपणीच्या खोडकर लिलांचे स्मरण म्हणून हा उत्सव साजरा केला जातो. पौराणिक कथेनुसार श्रीकृष्ण त्याच्या मित्रां सोबत दहीलोणी चोरण्यासाठी मानवी मनोरे बनवून उंच ठिकाणी ठेवलेली हंडी फोडत असत याच गोष्टीचे स्मरण म्हणून हा उत्सव





साजरा केला जातो.

१) पहाटे सकाळी ५ ते ७ महाभिषेक पार पडला.

२) ११ वा कानिफनाथ भजनी मंडळ व ज्ञानेश्वर भजनी मंडळ बोपगांव यांचा सुरेख असा भजनाचा कार्यक्रम झाला.

३)१२ वा महाआरती झाली

४)१ वा. पारंपरिक पद्धतीने कानिफनाथ भक्त सर्जेराव (नाना )जगदाळे यांच्या हस्ते दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम पार पडला.

अभंग व कृष्णच्या गवळणी सुरेल आवाजात महिला भजनी मंडळ यांनी गायल्या यांना बीड चे महाराज हार्मोनियम व तबला वादक बाळूतात्या फडतरे यांनी सुरेख साथ दिली.तशेच उत्तम बापू फडतरे, रंगनाथ फडतरे, सुनील बापू फडतरे, गणेश आबा फडतरे, पपू गुरव, माऊली कदम, सुदाम तात्या फडतरे, शिवाजी आबा जगदाळे,सुनील अण्णा फडतरे,बाळू फडतरे, प्रकाश नाना फडतरे या सर्वांनी गायनाची सुंदर साथ दिली. सर्व भाविकाणसाठी महाप्रसादाची सोय म्हस्कु आप्पा फडतरे मित्र मंडळ व पुणे यथील दहीहंडी मित्र मंडळ यांनी केली होती. मोठया संख्येने भाविकभक्त हजर होते. नवनाथ देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष माऊली भाऊ फडतरे, सचिव जयवंत नाना फडतरे,खजिनदार नागेश भाऊ फडतरे, प्रकाश भाऊ फडतरे, प्रकाश नाना फडतरे, महादेव फडतरे, नितिन फडतरे, वेवस्थ-ापक संतोष गोफणे व तरुण तशेच ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

**पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डंगळे आक्रमक**

# पंढरपूर शहरात अवैध वाळू तस्करावर मोठी कारवाई; ४५ लाखाचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरात अवैध वाळू उपशाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्या असून त्यामुळे गावगुंडांच्या पोळ्या वाढत आहे या डोळ्याचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी नूतन उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डंगळे यांनी पुढाकार घेतला असून एसबीआय वैद्य वाळू उपशावर कारवाई करत तब्बल ४५ लाख १६ हजाराचा मध्यम ान जमा करून सहा वाळू माफियांचा दणका दिला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिना दिवशी साडेबाराच्या सुमारात जुना अकलूज रोड येथील श्रीनाथ मंगल कार्यालय शेजारी इसवी पंढरपूर येथील भीमा नदी पात्रातून वाळूचा होत असल्याची गोपनीय माहिती उपविभागी पोलीस अधिकारी प्रशांत डंगळे यांना मिळाले त्यानुसार त्यांनी तात्काळ संबंधित ठिकाणी पथक पाठवून छापा मारला.

अंधाराचा फायदा घेऊन एक पेपर चालक व एक जेसीबी चालक ही पळून गेला. मात्र दुसऱ्या टिप्पर चालकाला पोलीस पथकातील कर्मचाऱ्यांनी पकडले.

या कारवाईत १६ लाख ५० हजार रुपये किमतीचा एमएच १२ ए एच ०४७१ या क्रमांकाचा विना क्रमांकाचा टिपर १३ लाख ५० हजार रुपये किमतीचा क्रमांक खोडलेला टिपर, व १६ हजार रुपये किमतीची आठ ब्रास वाळू असा एकूण ४५ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलाय या प्रकरणी पोलिसांनी अभिजीत शरद लोकरे राहणार ( शिरडून तालुका पंढरपूर) उमेश शिंदे (राहणार इस बावी तालुका पंढरपूर) यांच्यासह अनोळखी चार जनावर तो गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# स्वातंत्र्यदिनी जिल्हा परिषद शाळा आंबेडकरनगर म्हारळ व जिल्हा परिषद शाळा वंजारवाडी येथे शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कल्याण/बाळासाहेब अहिरे : माजी जिल्हा परिषद सदस्य सौ वृषालीताई विलास शेवाळे व ग्रामपंचायत सदस्य सौ. मोनिकाताई मुकेश गायकवाड यांच्या सहकार्याने ७९ व्या स्वतंत्र दिनी जिल्हा परिषद शाळा आंबेडकरनगर म्हारळ व जिल्हा परिषद शाळा वंजारवाडी म्हारळ या दोन्ही शाळेतील विद्यार्थींना शैक्षणिक साहित्य व बॅग वाटप करण्यात आली.

सदर प्रसंगी सौ. वृषालीताई विलास शेव-ाळे, मोनिका मुकेश गायकवाड सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सौ. उज्ज्वला गवाळे मॅडम सौ.म निषा गायकवाड दोन्ही शाळेतील मुख्याध्यापिका व सहकारी शिक्षिका तसेच पालक उपस्थित होते.

